REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2018

# स्वातंत्र्योत्तर स्त्रीवादी आत्मचरित्रे - चिंतन

प्रा. डॉ. शिवाजी नागरे
शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला.

## स्त्रीवाद म्हणजे काय ?

स्त्रीवाद म्हणजे लिंगभेद झुगारुन स्त्री-पुरुष समानतेकडे वाटचाल करणारा विचारप्रवाह आहे. सामान्यत: स्त्रीवाद ही पुरुषविरोधी चळवळ समजली जाते. परंतु ही पुरुषविरोधी चळवळ नाही. प्राचीन काळापासून मानवी समाजात स्त्री-पुरुष संबंध कसे असावेत याबाबत अनेक विचारप्रवाह निर्माण झाले. काही विचारप्रवाहांची स्त्री-पुरुषांची जन्माधिष्ठित व लिंगभेदानुसार विभागणी करुन त्यानुसार त्यांच्या कार्याची वाटणी केली. स्त्री-पुरुषामध्ये निसर्गानुसार काही भेद आहेत. जसे स्त्रीला लाभलेली नवनिर्मितीची क्षमता व मुलांचे संगोपन. यामुळे ती कुटुंब या व्यवस्थेशी बांधल्या गेली.

पण त्यामुळे पुरुषप्रधान व्यवस्थने तिच्या या औदार्याचा फायदा घेऊन तिच्यावर अनेक कवणे रुचून स्वत:चा स्वार्थ साधण्याकरीता तिला अध्यात्मिक उंचीवर नेऊन बसविले. तर दुसरीकडे तिच्या रजस्वाला समोर करुन धार्मिक व सामाजिक कार्यापासून दुरही लोटले. एवढेच नव्हे तर शारीरिक भेदामुळे तिला प्रजोत्पादनाचे साधन म्हणून दुय्यम स्थान दिले. तिचे माणूसपण नाकरले.

पाश्चात्य देशात स्त्री शिक्षणाचा प्रचार-प्रसार झाल्याने स्त्रियांना आत्मभान आले. आपण माणूस म्हणून जन्माला आलो आहोत. निसर्गाने आपली निर्मिती करतांना स्त्री-पुरुष म्हणून कोणताही भेद केलेला नाही. त्यामुळे येथील मानवसमाजाने व पुरुषप्रधान समाजव्यवस्थेने आपली सत्ता प्रस्थापित करण्यासाठी जन्माधिष्ठीत व लिंगभेदानुसार स्त्रीला दुय्यम स्थान दिले आहे. तिला माणूसपणाच्या अधिकारापासून वंचित केले. जन्मापासूनच कुणाच्या ना कुणाच्या वर्चस्वाखाली तिला जगायला लावले. या अन्यायापासून मुक्ती मिळविणे व माणूस म्हणून असलेले आपले अस्तित्व प्राप्त करणे, यासाठी अमेरिका व युरोपात 1960 च्या दरम्यान स्त्रीवादाचा जन्म झाला.

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळापासून स्त्रीच्या जीवनाविषयी, तिच्या प्रश्नाविषयी लेखन झाले आहे. मात्र त्या लेखनात असलेली जाणीव ही उद्धाराची, सहानुभूतीची वा सुधारवादाची होती. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा प्रचार-प्रसार झाल्याने तसेच इंग्रजी सत्तेच्या काळात ते आपल्या स्त्रियांना देत असलेल्या समान वागणुकीमूळे भारतातील पुरुषांबरोबरच स्त्रियांनाही भारतीय संस्कृतीत स्त्रियांच्या होणाऱ्या शोषणाची जाणीव तिव्रतेने व्हायला लागली. स्त्रियांना आत्मभान यायला लागले. याच दरम्यान भारतात समाजसुधारणेची चळवळ जोर धरायला लागली होती. त्यांनी सुधारणावादी दृष्टिकोनातून केलेल्या स्त्रीविषयक लेखन व कार्यातून रुढीवादी जाणिवांना गडद रुप प्राप्त झाले. या सगळ्या घडामोडीतून भारतात 1970 च्या दरम्यान स्त्रीवादाची पाळेमुळे रोवली गेली.

## स्त्रीवादाच्या व्याख्या :

स्त्रीवाद या शब्दाला हिंदीमध्ये नारीवाद असे म्हणतात. तर इंग्रजीत Feminism असे म्हणतात.

“Feminism is a range of political movement, ideologies and social movements that share a common goal; to define, establish and achieve, political, economic, personal and social equality of sexes. ”



## Dictonary of Cambridge :

The belief that woman should be allowed the same rights, power and opportunities as men and be treated in the same way or the set of activities intended to achieve this state.

### स्त्रीवादी साहित्य म्हणजे काय ?

स्त्रीवाद ही समाजपरिवर्तन करु पाहणारी एक राजकीय जाणीव आहे. प्रत्येक टप्प्यावर मानवी समाजामध्ये स्त्री-पुरुषांमध्ये विशिष्ट प्रकारचा सत्तासंबंध जोडला जातो. हे भान या जाणिवेत असते. लिंगभेदानुसार आधारलेली विषमता ही जीवशास्त्रीय किंवा निसर्गानुसारी नसून ती मानवी समाजात घडविली जाते असे स्त्रीवाद्यांचे मत आहे. स्त्रीवादी साहित्य हे स्त्री-पुरुष विषमतेच्या प्रश्नांची मिमांसा करते. या विषमतेच्या मुळाशी असलेल्या कारणांचा शोध घेते आणि या कारणांवर कराव्या लागणाऱ्या उपाययोजनांचे साहित्यातून चित्रण करते.

प्रत्येक टप्प्यावर स्त्रीवादाची भिन्न-भिन्न प्रकारची रुपे दिसतात. त्यांचे प्रतिबिंब स्त्रीवादी साहित्यात उमटलेले आहे. हे साहित्य मानव म्हणजे केवळ पुरुष आणि स्त्री ही त्याचे उपांग. या विचाराला छेद देते. स्त्रीच्या असण्याचा, होण्याचा समग्रपणे वेध घेते आणि स्त्रीला आत्मभान प्राप्त झाल्यापासून ते तिने घेतलेल्या आत्मशोधाच्या प्रवासाचा वेध घेते.

स्त्रीवादी साहित्याविषयी अनेक प्रश्न अभ्यासकांना पडतात. जसे स्त्री निर्मित साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य का ? पुरुषांनी केलेल्या स्त्रियांविषयींच्या लेखनाला स्त्रीवादी साहित्य म्हणता येणार नाही का ? किंवा स्त्री ने केलेले कोणतेही लिखान स्त्रीवादी साहित्य म्हणावे का ? तर याविषयी असे म्हणता येईल की केवळ स्त्रियांनी लिहिलेले कोणतेही लेखन स्त्रीवादी साहित्य होणार नाही. तसेच केवळ स्त्रीकेंद्री लिहिणे किंवा स्त्री दु:खाच्या करुण कहाण्या, पराभूत नियतिवादी पध्दतीने अथवा दया, उद्धाराच्या कल्पनेतून रेखाटणारे अथवा स्त्रियांच्या शौर्यगाथा, सरळसोट पध्दतीने मांडणारे साहित्य स्त्रीवादी साहित्य म्हणता येणार नाही. केवळ स्त्री निर्मित साहित्य नव्हे तर पुरुष विचारव्युहातून मुक्त अशा परिप्रेक्षातून स्त्री वा पुरुषाने निर्माण केलेले साहित्य स्त्रीवादी साहित्य म्हणता येईल. भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई पासून ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, लक्ष्मीबाई टिळक तसेच अनेक पुरुष लेखकांनी या जाणिवेतून साहित्याची निर्मिती केलेली आहे. उदा. महात्मा जोतिबा फुले, लोकहितवादी, गो.ग. आगरकर, म.गो. रानडे इ.

स्त्रीवादी साहित्य ही संकल्पना भारतात आली ती ब्रिटीश आणि अमेरिकन स्त्रीवादी चळवळीतून आणि स्त्रीवादी साहित्यातून. भारतात ही चळवळ 1975 च्या आसपास स्थिरावली व नव्या स्त्रीवादी जाणिवेतून लेखन होऊ लागले.

### स्त्रीवादी साहित्याच्या व्याख्या :

#### 1) विद्युत भागवत :

मानव म्हणजे पुरुष. स्त्री हे त्याचे उपांग. ह्या विचाराला छेद देणारे, त्याबद्दल प्रश्न निर्माण करणारे, त्यातील जटीलता, धुसरता मांडणारे, बाईच्या असण्याचा, होण्याचा समग्रतेचे वेध घेणारे, तिच्या आत्मशोधाचा प्रवास साहित्यिक अविष्कार म्हणून मांडणारे लेखन स्त्रीवादी साहित्य म्हणता येईल.

#### 2) ज्युलिया ख्रिस्तेवा या फ्रेंच स्त्रीवादी लेखिकेच्या मते,

बाई किंवा स्त्री ह्या शब्दाची रुढ व्याख्या स्वीकारणे आणि आणि बाई किंवा पुरुष आहोत हे मान्य करणे ह्यातच एक प्रकारची अर्थहिनता आहे. स्त्रियांचे स्थान परिघावर असते. अशी मांडणी पुरुषप्रधान मूल्यव्यवस्थेच्या आधारानेच केली जाते म्हणून ही मूल्यव्यवस्था उलथवून टाकण्याचे प्रयत्न करणारे साहित्य स्त्रीवादी साहित्य होय.

#### 3) विकीपिडीया -

भिन्न भिन्न स्त्रीवादी जाणिवा व्यक्त करणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. किंवा पुरुषांच्या आधाराशिवाय स्त्रीच्या व्यक्तिमत्वाला परिपूर्णता येऊ शकते आणि प्रेमाइतकीच माणसासारखे जगण्याची भूक स्त्रीलाही असते, हे दर्शविणारे आणि स्त्री म्हणून घडतांना आलेल्या अनुभवांना अभिव्यक्त करणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय.

स्त्रीवादी साहित्याच्या वरील व्याख्यांवरुन स्त्रीवादी साहित्याबद्दल काही निष्कर्ष काढता येतात.

1) स्त्रियांच्या प्रश्नांची समग्रतेने चिकित्सा करणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य.
2) स्त्रियांना बाई मानणाऱ्या पारंपारिक मूल्यव्यवस्थेला उलथवून लावून स्त्री-पुरुष समानतेवर आधारित नवसमाजाची निर्मिती म्हणजे स्त्रीवाद साहित्य.
3) भिन्न भिन्न स्त्रीवादी जाणिवांना अभिव्यक्त करणारे साहित्य.
4) स्त्री म्हणून घडतांना आलेल्या अनुभवांना अभिव्यक्त करणारे साहित्य.

### स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीवादी आत्मचरित्रे :

स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रियांच्या आत्मचरित्रातून संसार, संगीत, सिनेमा, समाजसेवा, नृत्य, शिक्षण या क्षेत्रातील स्त्रियांच्या अनुभवांचा ठसा वाचकांच्या मनावर उमटतांना दिसतो.

'जाऊ मी सिनेमात'-1947-अन्नपूर्णाबाई रानडे, 'स्मृती तरंग' - इंदिरा भागवत, 'या सदाशिव'- 1950-रोहिणी भाटे, 'माझी नृत्यसाधना'-1952-लक्ष्मीबाई पटवर्धन, 'माझा नंदादीप'-राधाबाई केदार, 'वेचलेले मणी'-1959-गिरीजा केळकर, 'द्रोपदीची थाळी'-1961-राधाबाई आपटे, 'ढळला रे ढळला दिन सख्या' व 'उमटलेली पावले'-1965-सत्यभामा सुखात्मे, 'गेले ते दिवस'-यशोदा जोशी, 'आमचा जीवन प्रवास'-1968-मृणालिनी देसाई, 'निशिगंध'-रुथ हिवाळे, 'आमचे कृतार्थ सहजीवन'-1969-शीलवती केतकर, 'मी हे सांगितले पाहिजे'-सुधा अत्रे, 'गोदातरंग'-1970-जानकी फडणीस, 'स्मरणमाला'-गोदावरी परुळेकर, 'जेव्हा माणूस जागा होतो'-ज्योत्सना भोळे, 'स्वरवंदना'-1971-सुमती शहार, 'हे गीत जीवनाचे'-1972-आनंदी शिर्के, 'सांजवात'- प्रमिला भालेराव, 'अश्वत्थाची फुले'-आनंदीबाई विजापूरे, 'अजूनी चालतेची वाट'- हंसा वाडकर, 'सांगा ऐका'-1974-सई आठवले, 'आंब्याचा डोळा'-1975-सरोजनी सारंगपाणी, 'दुर्देवाशी दोन हात'-आशालता भावे- पानाआडचे फूल'.

स्त्रियांनी लिहिलेल्या चरित्रात पतीनिष्ठा, त्यांचे कर्तुत्व, त्यांच्या सहवासातील आठवणी, अशा भावना व्यक्त झाल्या आहेत. त्यांनी पतीची इच्छा, लोकांचा आग्रह, कोणी सुचविले म्हणून, हौस म्हणून, दु:ख विसरण्यासाठी, पतीविषयी लोकांचे गैरसमज दूर व्हावेत, सहजीवनातील कृतार्थता व्यक्त करावी म्हणून चरित्रे लिहिली आहेत.

1981 मध्ये कुमुद पावडे यांचे 'अंत:स्फोट' हे आत्मचरित्र प्रकाशित झाले. दलित स्त्रीचे आत्मकथन म्हणून याची विपूल चर्चा झाली. त्या पाठोपाठ मल्लिका अमरशेख ह्यांचे 'मला उदध्वस्त व्हायचंच' हे आत्मचरित्र 1984 मध्ये प्रकाशित झाले. या पुस्तकाची वादळी चर्चा झाली. हे आत्मचरित्र पती पत्नीमधील नाजूक नात्यांची स्फोटक कहाणी जशी आहे तशी दलित समाज आणि चळवळीवर भेदक भाष्य करणारी हकिकतही वाटते. 1986 मध्ये शांताबाई कांबळे याचे 'माज्या जन्माची चित्तरकथा' आणि बेबी कांबळे यांचे 'जीणं आमुचं' व 'आयदान' हे उर्मिला पवार यांचे आत्मचरित्र ही आत्मचरित्र प्रकाशित झाली. ह्या आत्मचरित्रामध्ये दलित स्त्रियांची वेदना व्यक्त झालेली आहे. 1995 मध्ये नजूबाई गावित यांचे 'आदेर' हे आदिवासी स्त्रीचे आत्मचरित्र प्रकाशित झाले. ह्यामध्ये आदिवासी स्त्रीच्या जीवनातील दैन्य आणि दारिद्र्य व्यक्त झालेले आहे.

## निष्कर्ष :

1) स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रियांच्या आत्मचरित्रातून संसार, संगीत, सिनेमा, समाजसेवा, नृत्य, शिक्षण या क्षेत्रातील स्त्रियांच्या अनुभवांचा ठसा वाचकांच्या मनावर उमटतांना दिसतो.
2) स्वातंत्र्योत्तर काळातील आत्मचरित्रातून सहजीवनातील कृतार्थता व्यक्त करणे हाच मुख्य उद्देश राहिला आहे.
3) स्त्रियांच्या आत्मचरित्रातून अजून स्त्रीपुरुषातील ताणतणावाचे, स्त्रिंयांच्या जीवनातील भावांदोलनाचे, आव्हानाचे म्हणावे तसे चित्रण झालेले नाही.
4) स्वातंत्र्यपूर्वकाळातील आत्मचरित्राच्या मानाने स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांनी आत्मचरित्र या वाड्.मय प्रकारातून फारसे लेखन केलेले नाही.

## संदर्भग्रंथ

1) विकासपिडीया
2) साने गीता : भारतीय स्त्री जीवन, मौज प्रकाशन गृह, मुंबई, दुसरी आवृत्ती 1997
3) लांजेवार डॉ.ज्योती : भारतीय समाज आणि स्त्री, सुगावा प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती मार्च 2005.
4) साळूंखे आ.ह. : हिंदू संस्कृती आणि स्त्री, लोकवाङ्मय गृह, मुंबई, नववी आवृत्ती फेब्रुवारी 2018.
5) धोंगडे डॉ. अश्विनी : स्त्री वादी समीक्षा स्वरुप आणि उपयोजन, दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती 1993.